**MHAK110006802026**

<u>**एम. जे. सी. क्र. १४०/२०२६ चे निशाणी क्र. १ खालील आदेश**</u>

**पुरुषोत्तम – वि.– निरंक**

प्रस्तुतचा अर्ज अर्जदारांनी कलम ३ व ७ बॉम्बे रेग्युलेशन कायद्यानुसार दाखल केलेला आहे. सदरचा अर्ज अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी सादर केला आहे.

२. अर्जदारांनी असे कथन केले आहे की, अर्जदार हा मयतांचा मुलगा आहे. अर्जदाराची आई नामे गिताबाई रामभाउ खाडे यांचा मृत्यु दिनांक १०.०२.२०२४ रोजी व अर्जदाराचे वडील नामे रामभाउ आनंदराव खाडे यांचा मृत्यु दिनांक २०.०९.१९९९ रोजी झाला आहे. मयत गिताबाई रामभाउ खाडे व मयत रामभाउ आनंदराव खाडे हे बजरंग चौक, माळेगांव नाका, तेल्हारा, ता. तेल्हारा, जि. अकोला येथील रहीवासी होते. अर्जदार असे कथन करतात की, मयत यांना अर्जदाराव्यतिरीक्त ईतर कुठलेही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार हेच मयत गिताबाई रामभाउ खाडे व मयत रामभाउ आनंदराव खाडे यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदाराला शासकीय, निमशासकीय व खाजगी कामासाठी वारस प्रमाणपत्राची अत्यंत आवश्यकता आहे. करिता अर्ज मंजुर होण्यास विनंती केली आहे.

३. अर्जदारांनी वृत्तपत्रामध्ये जाहीर प्रगटन काढून हरकत मागविण्यात आली. सदरचे जाहीर प्रगटन हे दिनांक १८.०४.२०२६ रोजीच्या 'दैनिक सायरन' आवृत्तीमध्ये प्रसिध्द करण्यात आले परंतु ३० दिवसांच्या कालावधीत सदर प्रकरणात कोणीही हरकत उपस्थित केलेली नाही. त्यामुळे सदर प्रकरण विना हरकत, विना उजर आणि विना आक्षेप चालविण्यात आले आहे.

४. अर्जदार याने त्याचे अर्जाचे पुष्ठर्थ प्रतिज्ञापत्र निशाणी क्र. ०९ दाखल केले. त्याने त्याच्या सरतपासात त्याच्या अर्जाशी सुसंगत बाबी शपथेवर कथन केल्या आहेत. अर्जदाराने कागदोपत्री पुराव्यामध्ये मयत गिताबाई रामभाउ खाडे व मयत रामभाउ आनंदराव खाडे यांचे मृत्यु प्रमाणपत्राची पडताळणी केलेले प्रत अनुक्रमे नि. क्र. १० व ११, अर्जदार यांच्या आधारकार्डाची पडताळणी केलेली प्रत नि. क्र. १२ वर तसेच दिनांक १८.०४.२०२६ रोजीचे 'दैनिक सायरन' मध्ये

प्रसिध्द झालेले जाहीर प्रगटन निशाणी क्र. १३ वर दाखल केलेले आहे. सदर अर्जात हरकतदार कोणीही नसल्याने अर्जदारांचा पुरावा व प्रस्तुत दस्ताऐवज विना उजर व आक्षेपविना राहीले आहे.

५. अर्जदारांनी पुरावा बंद केल्याबाबतची पुरसिस निशाणी क्र. १४ वर दाखल केली आहे. संपुर्ण दस्ताऐवजांचे अवलोकन केले असता व वकीलांचा युक्तिवाद ऐकला असता, अर्जदार हेच मयत महेंद्र श्रावण रहीले यांचे वारस असल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे अर्जदारांना वारस प्रमाणपत्र देणे न्यायसंगत वाटते. करिता खालील आदेश.

## **आदेश**

१. अर्ज मंजुर करण्यात आला.

२. अर्जदार पुरुषोत्तम रामभाउ खाडे, रा. बजरंग चौक, माळेगांव नाका, तेल्हारा, ता. तेल्हारा, जि. अकोला हे मयत गिताबाई रामभाउ खाडे व मयत रामभाउ आनंदराव खाडे यांचे कायदेशीर वारस असल्यामुळे त्यांना आवश्यक ते न्यायालयीन शुल्क अदा केल्यानंतर वारस प्रमाणपत्र देण्यात यावे.

NEHA VIJAY SHAHU

Digitally signed by NEHA VIJAY SHAHU
Date: 2026.06.24 16:32:35 +0530

(श्रीमती एन. व्ही. साहु)

दिनांकः–२४.०६.२०२६

दिवाणी न्यायाधिश, क. स्तर,
तेल्हारा.

## C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this P.D.F. File Order/Judgment are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | S. R. Adhau |
| Name of the Court | Civil Judge (J.D.) & J.M.F.C., Telhara. |
| Date of Order /Judgment | 24.06.2026 |
| Order/Judgment Signed by the P.O. On | 24.06.2026 |
| Judgment/Order uploaded on | 24.06.2026 |